| MHKO140006142023 | नियमित दिवाणी दावा नं.१२९/२०२३<br>गोविंद सोमा कांबळे<br>विरुद्ध<br>पांडुरंग सोमा कांबळे |
|---|---|

## निशाणी १९ खालील आदेश

## (दिनांक २१/०१/२०२६)

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.८ यांनी त्यांचेविरुद्ध निशाणी क्र.१ खाली पारित प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द होवून लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुत दावा वाटणीसाठी, स्वतंत्र कब्जासाठी आणि कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.८ हे गरीब कुटुंबातील असुन त्यांना मजुरीसाठी बाहेरगांवी जावे लागते. दाव्याचे समन्स बाजवणी प्रस्तुत प्रतिवादी यांस झाल्यानंतर त्यांना मुदतीच्या आत न्यायालयासमोर हजर राहून लेखी जबाब सादर करता आला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश झालेला आहे. त्यामुळे सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करीता प्रस्तुतचा अर्ज.

३. वादीचे सुविद्य विधिज्ञ यांनी अर्जास म्हणणे सादर करुन विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील नमुद केलेली कारणे खोटी व चुकीची आहेत. तसेच प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक विलंब केलेला आहे. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर होण्यास पात्र आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाचे सुविद्य विधिज्ञ यांचा युक्तीवाद

ऐकला. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रतिवादी यांच्याविरुध्द वाटणीसाठी, स्वतंत्र कब्जासाठी आणि कायम मनाई मिळणेसाठी दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.८ यांना दावा समन्स लागु होवून देखील त्यांनी प्रकरणामध्ये हजर राहून लेखी म्हणणे दाखल केलेले नाही. त्यांनी ५ महिन्यापेक्षा जास्त विलंब केलेला आहे. परंतु दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये पुढील सुनावणी झालेली नाही आणि प्रकरण हे इतर प्रतिवादी यांच्या हजरीकरिता आणि लेखी जबाबाकरिता प्रलंबित आहे. तसेच प्रतिवादी यांनी अर्जासोबत लेखी जबाब सादर केलेला आहे. तसेच प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता विलंब झाल्याच्या कारणावरुन प्रतिवादी यांना प्रकरणात हजर राहून लेखी जबाब सादर करण्याची संधी नाकारणे योग्य होणार नाही. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी प्रतिवादी यांना कैफियत सादर करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजुर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दाव्यामध्ये वादी यांचा पुरावा सुरु झालेला नाही. प्रकरणात गुणवत्तेवर न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी यांना लेखी जबाब सादर करण्याची परवानगी देणे नैसर्गिक न्याय तत्वाच्याआधारे आवश्यक व न्यायोचित आहे. तसेच झालेल्या विलंबाबाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रु.६००/- बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.८ यांचेविरुद्ध पारित प्रकरण एकतर्फा चालविण्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावी.

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2026.01.21 16:54:15 +0530

दि.२१/०१/२०२६

**(वामन डी. जाधव)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, चंदगड**